दैनिक
# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा    कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




✻ वर्ष : ०१ ले ✻ | ✻ अंक : ५३ ✻ | ✻ बुधवार २३ सप्टेंबर २०२६ ✻ | ✻ जालना ✻ | ✻किंमत : २ रूपये ✻ | ✻पृष्ठे : ४ ✻

◎Volume 01◎ | ◎ Issue 53 ◎ | ◎ Wednesday, Date : 23 September 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2◎ | ◎Pages 4 ◎

# पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्तांतर्गत 01 कोटी रुपये किमतीच्या 'नमो उद्यान' चे आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते भूमिपूजन

परतूर : परतूर नगरपरिषद निवडणुकीदरम्यान शहरातील नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले असून, नागरिकांसाठी 'नमो उद्यान' साकारण्यात येत आहे. शहरातील अबालवृद्ध, महिला, युवक तसेच लहान मुलांना विरंगुळा, व्यायाम आणि मनोरंजनासाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. दिलेला शब्द पाळण्याची आपली भूमिका असून, परतूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते परतुर येथे भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्ताह अंतर्गत 01 कोटी रुपये किमतीच्या नमो उद्यानचा भूमिपूजन समारंभ माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की 'नमो उद्यान'मध्ये नागरिकांच्या विविध गरजा लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले आहे. वृद्ध नागरिकांना उद्यानात फिरण्यासाठी पेव्हर ब्लॉकची व्यवस्था, लहान मुलांसाठी आकर्षक प्लेग्राउंड, योगाभ्यासासाठी विशेष जागा, सुंदर कारंजे, निवांत बसण्यासाठी व्यवस्था, हिरवळ तसेच लहान मुलांसाठी झोके आणि विविध खेळणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे शहरातील नागरिकांना कुटुंबासह काही वेळ आनंदात आणि आरोग्यदायी वातावरणात घालवण्यासाठी एक सुंदर ठिकाण उपलब्ध होणार असल्याचे यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले की विकासकामांसाठी प्रस्ताव पाठवा, निधीची कमतरता भासू देणार नाही परतूर शहराच्या विकासासाठी नगरपालिकेने विविध विकासकामांचे प्रस्ताव तयार करून पाठवावेत. शहराच्या गरजा लक्षात घेऊन विविध माध्यमांतून निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी शहरातील आवश्यक विकासकामांची मागणी करावी, त्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे लोणीकर म्हणाले की शहरातील देवी अहिल्याबाई होळकर सभागृहाच्या सुधारणेसाठी प्रस्ताव सादर करावा, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊ, असे आश्वासनही आमदार लोणीकर यांनी दिले. सभागृहाच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना विविध सामाजिक, सांस्कृतिक



✻ आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेला शब्द पाळला
✻ शहराच्या विकासासाठी नगरपालिकेने प्रस्ताव पाठवावेत; विविध माध्यमातून निधी उपलब्ध करून देणार
✻ देवी अहिल्याबाई होळकर सभागृहाच्या सुधारणेसाठी प्रस्ताव द्या, निधीची कमतरता भासू देणार नाही
✻ येत्या पाच वर्षांत परतूर शहराचा सर्वांगीण विकास करून सुंदर शहर निर्माण करण्याचा संकल्प

आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे  पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की
परतूर शहरातील नाट्यगृहाचे काम पूर्ण झाले असून, हे नाट्यगृह अद्ययावत एसी सुविधांनी सुसज्ज करण्यात आले आहे. मराठवाड्यातील क्रमांक एकचे नाट्यगृह म्हणून ते विकसित झाले असून, लवकरच जनतेसाठी खुले करण्यात येणार असल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले. गेल्या दोन दिवसांत शहरातील विविध भागांतील अंतर्गत सिमेंट रस्त्यांच्या कामांचे उद्घाटन करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या परिसरात चांगले आणि टिकाऊ रस्ते उपलब्ध होणार आहेत. आगामी काळात परतूर शहरातील प्रत्येक गल्ली-बोळात सिमेंटचे रस्ते करण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहर व ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीने सुलभ शौचालयाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यासाठीचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठविण्यात आला असून, लवकरच सुलभ शौचालय मंजूर करण्यात येईल, अशी माहिती आमदार लोणीकर यांनी दिली. परतूर शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असून, शहराच्या मूलभूत सुविधांसह सौंदर्यीकरण आणि आधुनिक सुविधांवरही भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या पाच वर्षांत परतूर शहराचा संपूर्ण विकास करून एक सुंदर, स्वच्छ आणि सुविधांनी परिपूर्ण शहर निर्माण करण्याचे आपले स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी नगरपरिषद आणि शहरातील नागरिकांच्या सहकार्याने आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. यावेळी नगराध्यक्ष प्रियंका ताई शहाजी राक्षे उपनगराध्यक्ष विजय नाना राखे भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर गटनेते प्रकाश चव्हाण गटनेते अखिल काजी भगवानराव मोरे दया काटे शहाजी राक्षे गणेश पवार खय्युम पठाण बाबासाहेब तेलगड नगरसेवक संदीप बाहेकर नगरसेवक सोनू अग्रवाल नगरसेवक सावता काळे नगरसेवक सतीश सोनवणे नगरसेवक रज्जाक कुरेशी नगरसेवक ऋषी कराळे नगरसेवक टॉपिक नायकवाडी कदीर कुरेशी मुस्ताक अन्सारी मंगेश डहाळे शाकीर खतीब माधवी संतोष पवार, सय्यद वाशिम, आबा कदम कृष्णा आरगडे ज्ञानेश्वर जईद गोपी ठाकूर विकास बोडके विक्रम चव्हाण असे भाई नंदू नंदेवार दत्ता मगर मलिक कुरेशी मुज्जू कायमखानी आसिफ भाई दत्ता मगर गणेश माने अमर बगडिया अजित पोरवाल आकाश राक्षे सुनील पाडेवार सुनील गायकवाड रामेश्वर मगर किशोर ठोंबरे गणेश शिंदे शेख मोबीन शेख अनिस सुरेश मोरे आकाश ठाकूर सुनील पाडेवार संतोष पवार गजानन उदेवा कृष्णा रासे बाळू मगर नितीन मगर नितीन चव्हाण गजानन चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने शहरातील नागरिकांची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निमंत्रणावरून राहुल लोणीकर यांची 'वर्षा'वर गणरायाचे दर्शन



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निमंत्रणावरून भाजपचे प्रदेश सचिव तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी 'वर्षा' या मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सवानिमित्त झालेल्या या भेटीत विविध विषयांवरही चर्चा झाली. यावेळी त्यांच्या समवेत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन जोगदंड तसेच अशोक खरात (कोरेगावकर) उपस्थित होते. गणरायाच्या दर्शनानंतर उपस्थितांनी एकमेकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

## लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेच्या परतूर तालुका कार्यकारिणीची निवड ; मधुकर पंडागळे तालुकाध्यक्ष; भगवान बोराडे सचिवपदी, महिला प्रतिनिधींचाही समावेश

परतूर (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटना-६१५ च्या परतूर तालुका कार्यकारिणीची निवड खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. उपस्थित कर्मचाऱ्यांच्या गोपनीय मतदानातून झालेल्या निवड प्रक्रियेत मधुकर पंडागळे यांची तालुकाध्यक्षपदी, तर भगवान बोराडे यांची सचिवपदी निवड करण्यात आली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी कर्मचारी वर्गामध्ये उत्साह दिसून आला. संपूर्ण निवड प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीने पार पडली. यामध्ये उपाध्यक्षपदी दत्ता राऊत, कोषाध्यक्षपदी विशाल ढवळकर यांची निवड झाली. तसेच महिला प्रतिनिधी म्हणून



राठोड मॅडम व पडघन मॅडम यांची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेस संघटनेचे राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण, मराठवाडा कार्याध्यक्ष संजय रामराव जगताप, जिल्हाध्यक्ष अनिल भैरे पाटील, अनुंकपा संघर्ष समितीचे राज्याध्यक्ष ज्ञानेश्वर भुजंग तसेच कनिष्ठ प्रशासन अधिकारी अमोल लोहेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. निवडीनंतर पंचायत समिती परतूरचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी कौशल प्रमोद पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून कर्मचारी हिताचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेने सकारात्मक भूमिका घ्यावी, तसेच शासकीय कामकाजात शिस्त, समन्वय आणि एकोपा कायम ठेवावा, असे आवाहन केले. (पान २ वर)

## विरेगाव शेतकऱ्यांचा सरकारला इशारा आक्रोश; विविध मागण्यांसाठी हजारो शेतकऱ्यांचा रास्तारोको!



विरेगाव/प्रतिनिधी : नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत मिळावी, पीक नुकसानीचे पंचनामे करावेत, पीकविमा भरपाई मिळावी, कर्जवसुलीस स्थगिती देऊन कर्ज पुनर्गठन करावे, तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, यासाठी आज विरेगाव बसस्थानक परिसरात हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत नियोजित शांततामय रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. विविध पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणातून शेतकऱ्यांच्या व्यथा, आर्थिक अडचणी आणि नुकसानग्रस्त शेतीची परिस्थिती प्रशासनासमोर मांडली. आंदोलनस्थळी निवेदन स्वीकारण्यासाठी तहसील कार्यालयाच्या वतीने मंडळ अधिकारी उपस्थित होते. तसेच विरेगावचे ग्रामविकास अधिकारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. तलाठी साहेबांनीही आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. मौजपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी संपूर्ण पोलीस स्टाफसह उपस्थित राहून आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार (पान २ वर)


## स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून व्यापाऱ्याला लुटले ; दोघांना अटक



भोकरदन (प्रतिनिधी) : कमी किमतीत सोने देण्याचे आमिष दाखवून सोनार व्यावसायिकाला मारहाण करत त्याच्याकडील १ लाख ८० हजार रुपयांची रोकड लुटणाऱ्या दोन आरोपींना भोकरदन पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. आरोपींकडून लुटलेली संपूर्ण रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दानापूर (ता. भोकरदन) येथे दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी ही घटना घडली. फिर्यादी संजय कालिपद महिती (वय ४६, व्यवसाय सोनारकाम, रा. जळगाव) यांना कमी किमतीत सोने देण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. त्यानंतर त्यांना मारहाण करून त्यांच्याकडील १ लाख ८० हजार रुपयांची रोकड जबरदस्तीने हिसकावून घेण्यात आली. याप्रकरणी भोकरदन पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४), ११५(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस उपनिरीक्षक सागर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र पथक तयार करण्यात आले. पोलिसांनी तांत्रिक माहिती व गोपनीय सूत्रांच्या (पान २ वर)

## जय महाराष्ट्र गणेश मंडळाच्या भंडाऱ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद गाव भागात महाप्रसादाचे आयोजन; सामाजिक एकोप्याचे दर्शन

परतूर (प्रतिनिधी) : शहरातील गाव भागात जय महाराष्ट्र गणेश मंडळाच्या वतीने सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी भव्य भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक उपक्रमानिमित्त मंडळाने भाविकांसाठी भोजन व महाप्रसादाची व्यवस्था केली होती. परिसरातील नागरिक आणि गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. गणरायाची विधिवत पूजा व आरती केल्यानंतर भंडाऱ्याला सुरुवात करण्यात आली. मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने भोजनाचे वाटप केले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला. भंडारा सुरळीत पार पडावा यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नियोजनपूर्वक जबाबदाऱ्या सांभाळल्या. भोजन तयार करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पंगतीचे नियोजन, महाप्रसादाचे वाटप आणि परिसराची स्वच्छता अशा विविध कामांमध्ये कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. गाव भागातील नागरिकांनीही या उपक्रमाला





मोलाचे सहकार्य केले. धार्मिक कार्यक्रमांबरोबरच समाजात बंधुभाव, एकोपा आणि सेवाभाव वृद्धिंगत व्हावा, या उद्देशाने भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झालेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले. उपस्थित भाविकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



**नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी** : धोपटेश्वर : सद्गुरू सोलारचे सर्वेसर्वा शिवाजी पाटील शिंदे यांच्या शुभहस्ते धोपटेश्वर येथील शिवशक्ती प्रतिष्ठानच्या गणपती बाप्पाची आरती उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. यावेळी गणपती बाप्पाच्या आरतीसाठी परिसरातील लहानगे, तरुण, महिला मंडळ तसेच ज्येष्ठ नागरिकांसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात आरती करण्यात आली. उपस्थित भाविकांनी गणरायाचे दर्शन घेत सुख-समृद्धी आणि निरोगी जीवनासाठी प्रार्थना केली.

## हैदराबाद मुक्ती संग्रामातील स्व. धाकलेश्वर मक्काजी करनाडे यांच्या कार्याची शासकीय पडताळणी करा; चौक नामकरण व पूर्णाकृती पुतळ्याची मागणी

हैदराबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक व माजी आमदार स्व. धाकलेश्वर मक्काजी करनाडे यांच्या कार्याची शासकीय अभिलेखांच्या आधारे पडताळणी करून त्यांच्या ऐतिहासिक योगदानाची अधिकृत नोंद करावी, तसेच त्यांच्या स्मृतीचे जतन करण्यासाठी चौक नामकरण व पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी केली आहे. यासंदर्भात राहुल करनाडे (पान २ वर)

# संपादकीय

## समान संधी

माजी नेस्ले इंडिया व्यवस्थापकीय संचालक सुरेश नारायण यांच्या मते, केवळ कोट्यावर आधारित नियुक्त्यांपेक्षा गुणवत्तेवर निवड प्रक्रियेला प्राधान्य दिले पाहिजे. कंपन्यांनी अशी कार्यसंस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे, जिथे महिलांना नेतृत्वाच्या संधी नैसर्गिकरीत्या उपलब्ध होतील. कॉर्पोरेट भारताने बोर्डरूममध्ये महिलांसाठी दारे उघडली असली, तरी सीईओ आणि एमडीसारख्या सर्वोच्च पदांपर्यंत महिलांची संख्या वाढविण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, देशातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही. हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी.साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. अमेरिकेने मला जी संधी दिली ती मला भारतातही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सुधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही. महिलांचे नेतृत्व, शिक्षण आणि करिअरविषयी आणि त्यांच्या पदाविषयी बोलायचे तर टॉप-५०० कंपन्यांमध्ये केवळ ०.४ टक्के महिला सीईओ असल्याचे समोर आलंय. या पार्श्वभूमीवर सुधा मूर्ती यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, महिलांना शिक्षण, कौशल्यविकास आणि करिअरमध्ये पुरुषांप्रमाणे समान संधी मिळाल्या पाहिजेत. मात्र, केवळ महिला असल्यामुळे कोणालाही पद मिळू नये हे मान्य नाही. नेतृत्वाच्या संधी पात्रता, मेहनत आणि गुणवत्तेच्या आधारावर मिळायला हव्यात. आर्थिक स्वातंत्र्यामुळे आज महिलांचा आत्मविश्वास वाढला आणि नेतृत्वाच्या संधीही विस्तारत आहेत. पण हे देखील इतकच खरं की कुटुंबातील जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि कार्यस्थळावरील अडचणी यामुळे अनेक महिला करिअरच्या मधल्या टप्प्यात मागे पडतात, याकडेही आपण लक्ष वेधायला हवं. कंपन्यांनी महिलांना टिकून राहता येईल, प्रगती करता येईल आणि नेतृत्वाच्या भूमिका स्वीकारता येतील, असे सकारात्मक आणि समावेशक कार्यपरिसर निर्माण करणे गरजेचे आहे. नूयी यांच्या वक्तव्यानंतर भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रात लिंगवैविध्य आणि महिलांच्या नेतृत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. बोर्डरूममध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याचे चित्र दिसत असले, तरी सर्वोच्च निर्णयक्षम पदांवर महिलांची उपस्थिती अत्यंत कमी असल्याचे समोर आले. ही परिस्थिती दर्शवते की महिलांना बोर्डमध्ये स्थान मिळत असले, तरी सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रवास अजूनही कठीण आहे. भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या प्रतिनिधित्वावर नव्याने चर्चा सुरू झाली. भारतात अनेक यशस्वी महिला उद्योगनेत्या घडल्या असल्या, तरी त्या अपवादात्मक उदाहरणे असल्याचे वास्तव आकडेवारी स्पष्ट करते. फॉर्च्यून कंपन्यांच्या आढाव्यातून स्पष्ट झाले, की देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या महिला असतानाही नेतृत्वाच्या सर्वोच्च पदांवर त्यांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. कंपनी कायदा २०१३ अंतर्गत प्रत्येक पात्र कंपनीने किमान एक महिला स्वतंत्र संचालक नियुक्त करणे बंधनकारक करण्यात आले. या निर्णयाचा सकारात्मक परिणाम दिसून आला. सीएफए इन्स्टिट्यूट इंडियाच्या माहितीनुसार बोर्डवरील महिलांचे प्रतिनिधित्व सुमारे १९ टक्क्यांपर्यंत पोहोचले. मात्र, या क्षेत्रात अजूनही मोठी दरी आहे. ४१ कंपन्यांमध्ये अजूनही एकही महिला स्वतंत्र संचालक नाही. २९६ कंपन्यांमध्ये केवळ नियमापुरती एक महिला संचालक आहे. तज्ज्ञांच्या मते, मुख्य समस्या बोर्डरूममध्ये नसून मध्यम आणि वरिष्ठ व्यवस्थापनाच्या स्तरावर आहे. महिलांना करिअरमध्ये टिकून राहण्यासाठी, नेतृत्व विकसित करण्यासाठी आणि समान संधी मिळण्यासाठी संस्थात्मक पातळीवर सक्षम धोरणे राबविणे अधिक आवश्यक आहे.

पान १ व ४ वरून...

### लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेच्या

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांना प्राधान्य देऊन संघटनेच्या माध्यमातून ते सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### विरेगाव शेतकऱ्यांचा सरकारला

पडण्यासाठी सहकार्य केले. विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनीही पक्षीय मतभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी उपस्थित राहून सहकार्य केले. विशेष म्हणजे, विरेगाव पंचक्रोशीतील शेतकरी, तरुण आणि युवकांनी हे आंदोलन आपल्या हाती घेत अत्यंत संयमाने, शिस्तीने आणि योग्य पद्धतीने पार पाडले. त्यामुळे आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

### स्वस्तात सोने देण्याचे

आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवत मस्तानखाँ मर्शीदखाँ पठाण (वय ५८, रा. खोकरी बाजार, ता. भोकरदन) आणि शेख कदीर शेख हमीद (वय ५२, रा. दानापूर, ता. भोकरदन) या दोघांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. चौकशीअंती दोन्ही आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले असता त्यांना दि. २२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. पोलिसांनी आरोपींची कसून चौकशी केली असता मस्तानखाँ पठाण याच्याकडून ६० हजार रुपये, तर शेख कदीर शेख हमीद याच्याकडून १ लाख २० हजार रुपये अशी एकूण १ लाख ८० हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. गुन्ह्यातील लुटलेली शंभर टक्के रक्कम हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक तेजस्विनी सातपुते, अपर पोलिस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कटेकर आणि प्रभारी अधिकारी संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सागर शिंदे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके, पोलिस अंमलदार गणेश पिंपळकर, अर्जुन टेकाळे, योगेश गवळी, लक्ष्मण राननाते तसेच गुन्हे शोध पथकातील साजेद शेख यांनी केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सागर शिंदे करीत आहेत.

### हैदराबाद मुक्ती संग्रामातील स्व.

यांनी जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनासोबत उपलब्ध जुन्या वृत्तपत्रीय कात्रणाची प्रत तसेच महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून २८ डिसेंबर १९८७ रोजी भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील कामगिरीच्या गौरवार्थ देण्यात आलेल्या सन्मानपत्राची झेरॉक्स प्रत सादर करण्यात आली.उपलब्ध वृत्तपत्रीय कात्रणात स्व. धाकलेश्वर मक्काजी करनाडे यांनी हैदराबाद मुक्ती संग्रामात भूमिगत राहून कार्य केल्याचा उल्लेख असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सन्मानपत्राची मूळ प्रत उपलब्ध नसल्याने संबंधित शासकीय नस्ती, अभिलेख व नोंदी शोधून त्याची अधिकृत पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

पडताळणीनंतर उपलब्ध अधिकृत नोंदीनुसार त्यांच्या ऐतिहासिक योगदानाची अभिलेखीय नोंद करावी, संबंधित कागदपत्रांचे जतन व डिजिटल अभिलेखीकरण करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.तसेच जालना-बदनापूर मार्गावरील योग्य व सुरक्षित चौकास स्वातंत्र्यसैनिक स्व. धाकलेश्वर मक्काजी करनाडे चौक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे सादर करावा आणि शासनाच्या नियमांनुसार आवश्यक मंजुरी घेऊन त्या ठिकाणी स्व. करनाडे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.ही मागणी कोणत्याही वैयक्तिक लाभासाठी नसून स्वातंत्र्यसैनिकांच्या ऐतिहासिक योगदानाचे दस्तऐवजीकरण, शासकीय अभिलेखांचे जतन आणि भावी पिढ्यांसाठी इतिहास सुरक्षित ठेवण्याच्या सार्वजनिक हिताच्या उद्देशाने करण्यात आल्याचे राहुल सत्यनारायण करनाडे यांनी सांगितले.

### सत्तेच्या आसनावर सज्जन

मूल्यांशी प्रामाणिक राहिलो आणि आपल्या विचारांना आचरणाची जोड दिली, तरच व्यक्तिमत्त्व महान घडते.

मनुष्याच्या आध्यात्मिक प्रगतीच्या मार्गातील तीन मोठे अडथळे म्हणजे कामिनी, कांचन आणि कीर्ती. विषयवासना, धनाची आसक्ती आणि प्रसिद्धीची लालसा यामध्ये मनुष्य गुंतला की त्याची तपश्चर्या, साधना आणि आत्मचिंतन मागे पडते. त्यामुळे जीवनात पैसा, प्रतिष्ठा आणि लौकिक यांचा उपयोग असला तरी त्यांच्याशी आसक्त होणे टाळले पाहिजे.

कार्य करणे चुकीचे नाही; पण केवळ संसाराचेच कार्य करत राहणे चुकीचे आहे. कुटुंब, व्यवसाय, समाज आणि प्रपंचाची कर्तव्ये नक्कीच पार पाडावीत; मात्र संपूर्ण आयुष्य केवळ भौतिक गरजा पूर्ण करण्यात खर्ची घालू नये. शरीरासाठी, संसारासाठी आणि संपत्तीसाठी जसा वेळ देतो, तसाच काही वेळ आत्मचिंतन, साधना, भक्ती आणि चैतन्याच्या विकासासाठी दिला पाहिजे. माणसाने बाहेरच्या जगात किती मिळवले यापेक्षा स्वतःच्या अंतरंगात किती मिळवले, हा खरा प्रश्न आहे. शरीर नश्वर आहे, संपत्ती नश्वर आहे, कीर्तीही नश्वर आहे; मात्र या सर्वांच्या पलीकडे असलेल्या चैतन्याचा शोध घेणे हेच जीवनाचे खरे सार्थक आहे. शरीरासाठी जगताना चैतन्याला विसरू नका; संसाराची कर्तव्ये पार पाडताना अध्यात्माला दूर करू नका; संपत्ती, सत्ता आणि कीर्ती मिळवताना त्यांचे गुलाम होऊ नका आणि महान होण्यापूर्वी स्वतःचा विचारांशी व आचरणाशी प्रामाणिक राहा, असे ते म्हणाले. समाज, धर्म आणि सेवा कार्यात येणारे अश्रूच परमात्म्यातजवळ नेऊन पोहोचवितात. मानवाचे दैनंदिन आचरण आणि कर्तव्यपालन हेच खरे धर्मपालन आहे. संकटाच्या प्रसंगी धैर्य आणि सकारात्मक वृत्ती ठेवून समाजासाठी उपयुक्त जीवन जगावे, कुणाचीही ईर्ष्या करू नये. आपण जे काही धन, संपत्ती, पैसा प्राप्त करतो ते सर्व काही नश्वर आहे. त्यात शाश्वत असे काहीच नाही. जो तो बेचैन आहे. संसारातील प्रत्येक जीवात्मा सुखाच्या शोधात आहे. आपल्याला दररोज थोडे फार सुख मिळते ही मात्र ते अखंडित नसते. सुखाने दुख यालाच जीवन असे नाव आहे. ते ज्याला आनंदात जगता येते तोच खरा सुखी आहे. आनंद आपल्या आतच असतो. मात्र आपण त्याला पाहण्याचा प्रयत्न करत नाही. हा आनंद शब्द, सुर, रस, हॉटेल, देश, विदेशात शोधतो. या आनंदासाठी भटकंती करत राहतो. मात्र तिथे आनंद मिळते का असा प्रश्न करून महाराज म्हणाले की, आनंद बाहेर कोठेही नाही, भौतिक सुखातही नाही. आनंदाची अखंड प्राप्ती श्रीमद् भगवद्गीता आणि भागवत कथेच्या श्रवणात आहे. देवाचा शोध बाहेर घेण्यापेक्षा अंतःकरणात घ्या; भक्तीने मन शुद्ध करा, ज्ञानाने जीवन समजून घ्या आणि सेवाभावी कर्मातून त्या ज्ञानाची प्रचिती द्या. जीवनातील सर्व समस्यांचे समाधान आपणास ऋषीमुनींनी दिलेले आहे. संत कृपेनेच भक्ती प्राप्त होते, असे ते म्हणाले. प्रत्येकाला कुठलीही मर्यादा किंवा परावलंबित्व नसलेले, स्वतःच्या अंतःकरणातून अनुभवता येणारे अनंत समाधान आणि आनंद हवा असून तो आपल्या आत शोधण्याऐवजी बाहेर कसा शोध घेतला जातो आहे, हे त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

शेवटी मुख्य यजमान, दैनिक यजमान आणि आरती यजमान संजय दाड, संतोष करवा, शामसुंदर लखोटीया, उमेश दाड, बद्रीनारायणजी बियानी, सतिश राठी, किशोर अग्रवाल, मनोज मोहता, राजेश राऊत, मिश्रिलाल बांगड, रामेश्वर बजाज, विष्णुप्रसाद दायमा, विनोद कुमावत, विनोद पवार, सुभाष दरक, कैलाश बियानी यांच्याहस्ते आरती करण्यात आली.

२६ सप्टेंबरपर्यंत दररोज दुपारी २ ते ६ या वेळेत चालणाऱ्या या सात दिवसीय भागवत कथा श्रावणाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

### राहत सोशल ग्रुप

जालना गेल्या २५ वर्षांपासून जालना शहरात यशस्वीपणे मुस्लिम सामूहिक विवाह सोहळे आयोजित करत आहे, जे कौतुकास्पद आहे आणि आतापर्यंत या मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांच्या माध्यमातून सहाशेहून अधिक मुस्लिम जोडप्यांचे विवाह झाले आहेत. या मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांमध्ये नोंदणीसाठी, मुलाचे वय २१ वर्षे आणि मुलीचे वय १८ वर्षे असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे, त्यामुळे सर्व इच्छुक पालकांना विनंती आहे की, आपल्या मुलामुलींची नोंदणी करण्यासाठी १५ नोव्हेंबरपूर्वी राहत सोशल ग्रुप जालनाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

### पत्रकारांनी बातमीदारी करताना

क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटविला. मितभाषी, मनमिळाऊ आणि अजातशत्रू व्यक्तिमत्त्व अशी त्यांची सर्वत्र ओळख होती. धार्मिक, राजकीय, सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचा सातत्याने वावर होता. कोणत्याही कार्यक्रमात आपल्या सहज, संयमी आणि आपुलकीच्या स्वभावामुळे ते अल्पावधीतच सर्वांशी जुळून जात असत. कोणालाही दुखावणार नाही, अशी त्यांची बोलण्याची आणि वागण्याची पद्धत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी आपल्या आठवणी सांगताना नमूद केले. आशीष रसाळ यांच्या निधनाने केवळ एका पत्रकाराचा नव्हे, तर विविध क्षेत्रांमध्ये आपुलकीचे संबंध निर्माण करणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचा आधार गमावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पत्रकारांचे काम अनिश्चित वेळेचे असते. घटना घडली की वेळ, दिवस-रात्र, ऊन-पाऊस याचा विचार न करता घटनास्थळी पोहोचून बातमी संकलित करण्याची जबाबदारी पत्रकार पार पाडतात. अनेकदा सततचा मानसिक ताण, अपुरी झोप, अनियमित आहार आणि व्यायामाचा अभाव यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. आशीष रसाळ यांच्या अकाली निधनाच्या घटनेने या बाबीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. पत्रकारांनी समाजासाठी काम करताना स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी. नियमित आरोग्य तपासणी, व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप यांना जीवनाचा भाग बनवावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आशीष रसाळ यांच्या कुटुंबीयांना आवश्यक ती मदत करण्यासाठी निश्चितपणे पुढाकार घेतला जाईल, असे सांगितले. रसाळ यांच्या कुटुंबाच्या पाठीशी उभे राहण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. माजी मंत्री राजेश टोपे यांनीही आशीष रसाळ यांच्या कुटुंबीयांबद्दल सहवेदना व्यक्त करून आवश्यक मदतीची भावना व्यक्त केली. माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर यांनी आशीष रसाळ यांच्यासोबतच्या अनेक आठवणींना उजाळा देत त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आपुलकी, सकारात्मकता आणि सर्वांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध यांचा उल्लेख केला.

उपमहापौर राजेश राऊत यांनी आशीष रसाळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनोखे वर्णन केले. ते म्हणाले की, आशीष रसाळ म्हणजे एक असे रसायन होते की, ज्या क्षेत्रात ते मिसळले जात, त्या क्षेत्रातील लोकांशी त्यांचे आपुलकीचे नाते निर्माण होत असे. विविध उपक्रमांमध्ये त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विशेषतः पर्यावरणपूरक गणपतींच्या स्पर्धांच्या आयोजनाचा उल्लेख करताना राऊत यांनी सांगितले की, स्पर्धेचे निकष निश्चित करण्यापासून ते अंतिम निकालापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत आशीष रसाळ यांची मोलाची साथ लाभत असे. त्यांच्या सहभागामुळे अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. आशीष रसाळ यांच्या अकाली निधनाने जालना शहरातील पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. तरुण वयात पत्रकारितेला वाहून घेत विविध क्षेत्रांमध्ये निर्माण केलेली त्यांची ओळख आणि मित्रत्वाचे संबंध यामुळे त्यांच्या जाण्याने अनेकांना मोठा धक्का बसला आहे. कार्यक्रमात उपस्थित पत्रकारांनीही रसाळ यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या स्वभावातील आपुलकी, सहकार्याची भावना आणि प्रत्येकाशी जुळवून घेण्याची हातोटी यांचा उल्लेख केला. पत्रकारितेच्या धावपळीत सहकाऱ्यांशी असलेले नाते जपणारा आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारा सहकारी गमावल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. यावेळी शिवसेना महानगरप्रमुख विष्णू पाचफुले, नाट्यकुंरचे ध. स. जैन, फेरोज अली, ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, लक्ष्मणराव राऊत, गुलाब पाटील, लियाकत अली खान, नारायण वाढेकर, भरत मानकर, दीपक शेळके, सुशीलकुमार वाठोरे, लहू गाडे, कैलास फुलारी, सीताराम तुपे, विष्णू कदम, सुनील नरवडे, नरेंद्र जोगड, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, अभियंता भुरेवाल, संजय देशमुख, महेश बुलगे, शरद सोनटक्के, रवी शिंदे यांच्यासह पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनसिंह सूर्यवंशी यांनी केले. आशीष रसाळ यांच्या निधनाच्या निमित्ताने पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बातमीच्या मागे धावताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, हा संदेश या श्रद्धांजली कार्यक्रमातून पुढे आला. पत्रकारांनी समाजाच्या प्रश्नांसाठी आपली लेखणी आणि कॅमेरा सदैव सज्ज ठेवतानाच स्वतःच्या आरोग्यासाठीही वेळ देणे आवश्यक आहे. आशीष रसाळ यांच्या आठवणींना उजाळा देताना उपस्थितांनी त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

पान १ व ४ वरून...

### संपादित केलेली अधिकृत

विभागाने संयुक्तपणे स्थळपाहणी करून पंचनामा करावा, अशी मागणी आहे. स्थानिक ग्रामपंचायत, सरपंच व ग्रामस्थांनी यापूर्वी संबंधित विभागाकडे अनेक वेळा मागणी केली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून, प्रत्यक्ष स्थळपाहणी करून वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणी करण्यात आली आहे. मनसेची प्रमुख मागणी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांसह आकणी येथील तलावाची प्रत्यक्ष पाहणी करावी, तलावाच्या मंजुरीपासून आजपर्यंतच्या संपूर्ण अभिलेखांची तपासणी करावी आणि निधी, खर्च, निविदा, कार्यारंभ आदेश, संबंधित कंत्राटदार किंवा एजन्सी, कामाची प्रगती तसेच काम रखडण्याची कारणे याबाबत सविस्तर अहवाल तयार करावा, असे निवेदनात म्हटले आहे. जमीन संपादनाची कागदपत्रे, शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या मोबदल्याची माहिती, संपादित जमिनीची सद्यस्थिती आणि तलाव पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी यांची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. काम रखडण्यास कोणता अधिकारी, विभाग किंवा संबंधित एजन्सी जबाबदार असेल, तर नियमानुसार जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी. तलावाचे उर्वरित काम तातडीने सुरू करून निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावे आणि परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे सिंचनाचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मनसेची ठाम मागणी असल्याचे प्रकाश सोळंके यांनी निवेदनात म्हटले आहे. जालना जिल्ह्यात मनसे विरोधी पक्षाची भूमिका पार पाडत असून, जनतेच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधणे ही आपली जबाबदारी आहे. राजकीय मतभेद किंवा मतदानाचे गणित न पाहता सर्व गावांना समान न्याय व विकासाच्या सुविधा मिळणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून संबंधित सर्व विभागांकडून अहवाल मागवावा, तलावाचे रखडलेले काम सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

### मुलींना कमर्शियल पायलट

Commercial Pilot Licence (CPL) आणि -TR Type Rating Training देण्यात येणार आहे. प्रशिक्षणाच्या कालावधीत निवास व भोजनासाठी १०० टक्के सहाय्य, वैद्यकीय विमा, पायलट मेंटॉरशिप आणि करिअर मार्गदर्शनाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. जिल्ह्यातील मुलींना पारंपरिक करिअरच्या पलीकडे जाऊन विमान वाहतूक क्षेत्रात संधी मिळावी आणि त्यांचा या क्षेत्रातील सहभाग वाढावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. आर्थिक किंवा सामाजिक परिस्थितीमुळे मुलींच्या स्वप्नांना मर्यादा येऊ नयेत, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जालन्यातील मुलींनी विमानात केवळ प्रवासी म्हणून नव्हे, तर कॉकपिटमध्ये पायलट म्हणूनही बसावे. त्यांनी आत्मविश्वासाने आकाशाला गवसणी घालावी, अशी भावना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी व्यक्त केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिद्ध केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२

# आर. पी. रोडवर भक्तीचा जल्लोष; सामाजिक संदेश देणारे देखावे ठरले आकर्षण




















## आर. पी. रोडवर भक्तीचा जल्लोष; सामाजिक संदेश देणारे देखावे ठरले आकर्षण

जालना : गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी रविवारची सुटी असल्याने शहरातील आर. पी. रोडवर गणेशभक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. कुटुंबीय, मित्रपरिवार आणि भाविकांनी विविध गणेश मंडळांच्या देखाव्यांना भेट देत बाप्पाचे दर्शन घेतले. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. आर. पी. रोड परिसरातील विविध गणेश मंडळांनी आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि देखणे देखावे उभारले होते. विशेष म्हणजे यंदाच्या देखाव्यांमधून केवळ धार्मिक वातावरण निर्माण करण्याऐवजी विविध सामाजिक विषयांवर जनजागृती करण्याचा प्रयत्न मंडळांकडून करण्यात आला.

अवयवदान, नशामुक्ती, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर आधारित देखावे भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होते. देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत होते. गणेश मंडळांकडून भाविकांसाठी विविध ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे दर्शनासाठी आलेल्या भाविकांची चांगलीच गर्दी झाली होती. लहान मुलांसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनीही उत्साहात गणेशोत्सवाचा आनंद घेतला. रविवारची सुटी आणि गणेशोत्सवाचा सातवा दिवस असल्याने सायंकाळपासून रात्रीपर्यंत आर. पी. रोडवर भक्तांची वर्दळ वाढली होती. आकर्षक रोषणाई, गणेशमूर्तींचे दर्शन आणि सामाजिक संदेश देणारे देखावे यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सत्तेच्या आसनावर सज्जन व्यक्तीला बसण्याचे कार्य संतांनी करावे:स्वामी गोविंददेवगिरीजी

जालना/प्रतिनिधी : सत्तेच्या आसनावर सज्जन व्यक्तीला प्रतिष्ठित करणे आणि समाजाला त्रास देणाऱ्या दुर्जन सत्ताधाऱ्याला दूर करणे हे संतांचे कार्य आहे. संत केवळ अध्यात्माची शिकवण देत नाहीत, तर समाजजीवनाला योग्य दिशा देण्याचे कामही करतात. सत्ता ही समाजकल्याणासाठी असावी, अन्याय आणि अधर्मासाठी नव्हे, असा मौलिक उपदेश श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे महामंत्री तथा श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास, मथुराचे उपाध्यक्ष प. पू. राष्ट्रीय संत गुरुदेव स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी येथे बोलताना दिला.

भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने मंठा रोडवरील आईसाहेब लॉन्स येथे आयोजित श्रीमद् भागवत कथेचे आज मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी तिसरे पुष्प गुंफतांना स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी मानवी जीवनात अध्यात्म, सदाचार आणि नीतिमत्तेच्या महत्त्वावर भर दिला. जीवन समृद्ध करण्यासाठी संतांचे विचार आणि प्राचीन संस्कृतीचे संस्कार अंगीकारणे ही काळाची गरज असल्याचे





त्यांनी स्पष्ट केले. प्रारंभी कथेचे मुख्य यजमान विष्णूकुमार चेचानी, दैनिक यजमान अरुण अग्रवाल, प्रसाद यजमान पुरुषोत्तम तोष्णीवाल यांच्याहस्ते पूजन करण्यात आले. दरम्यान, आजच्या कथेला जिल्हाधिकारी असीमा मित्तल यांनी उपस्थित राहून महाराजांचे आशीर्वाद घेतले.


महाराज पुढे म्हणाले की, मनुष्याने आपल्या शरीरासाठी आयुष्यभर अनेक गोष्टी केल्या. शरीराला सुख-सुविधा मिळाव्यात, त्याचे आरोग्य चांगले राहावे, त्याला ऐश्वर्य मिळावे यासाठी आपण सतत धडपडत राहतो; मात्र या जड शरीरामध्ये असलेल्या चैतन्याचा, आत्म्याचा आणि अंतर्मनाचा विकास करण्यासाठी आपण काय केले, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. बाह्य जीवन समृद्ध करण्याबरोबरच अंतःकरण समृद्ध करणेही तितकेच आवश्यक आहे.जीवनात महान व्हायचे असेल तर सर्वप्रथम स्वतःच्या शब्दांचा आणि स्वतःच्या विचारांचा आदर करायला शिका, असे सांगताना महाराजांनी आत्मविश्वास आणि आत्मशिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. आपण स्वतःशी केलेली वचने पाळली, स्वतःच्या (पान २ वर)

# 'आज का कर्मवीर' पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी संतोष शर्मा

क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिनेश लाड यांचा २७ सप्टेंबर रोजी गौरव करण्यात आला. 'आज का कर्मवीर २०२६' पुरस्काराने सन्मानित केले जाणार

मुंबई, २७ सप्टेंबर: क्रीडा क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे आणि रोहित शर्मा यांचे 'गुरू' म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांची प्रतिष्ठित 'आज का कर्मवीर पुरस्कार - २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. आज, 'कर्मवीर सोशल फाउंडेशन'तर्फे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा



पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील नेतृत्व, मार्गदर्शन आणि दीर्घकालीन योगदानाबद्दल दिनेश लाड यांना 'मार्गदर्शक' (Mentor) किंवा 'विशेष विभाग' (Special Department) श्रेणीतील पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता 'द वेस्टिन हॉटेल', गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे एका भव्य समारंभात आयोजित केला जाईल. फाउंडेशनचे संचालक जेम्स डिसूझा यांनी यासंदर्भात त्यांना निमंत्रित करणारे अधिकृत पत्र पाठवले आहे. पुरस्कार सोहळ्यादरम्यान दुपारी ३ ते ६ या वेळेत 'आरोग्य, संपत्ती आणि सनातन धर्म' यांसारख्या विषयांवर विशेष चर्चासत्रे आयोजित केली जात आहेत. दिनेश लाड सर यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण दिले आहे. त्यांच्याबद्दलच्या आदरामुळे क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

# अंबड बसस्थानक परिसरात भीषण आग; ६ ते ७ दुकाने जळून खाक

अंबड । निलेश मणियार, तालुका प्रतिनिधी : अंबड शहरातील जालना-बीड रस्त्यावरील बसस्थानक परिसरात आज पहाटे ४ ते ५ वाजण्याच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत रस्त्यालगतची अंदाजे ६ ते ७ दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली असून, व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी शर्थीचे



प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आधीच दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या व्यापाऱ्यांवर या आगीमुळे मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. दुकानांमधील साहित्य व माल जळून खाक झाल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पंचनामा करून नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# राहत सोशल ग्रुप जालनातर्फे आयोजित मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्याचे भिंती पत्रकाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते विमोचन

जालना/प्रतिनिधी : राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून यशस्वीपणे मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करत आहे. यावर्षीही, रविवार, २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १0:३0 वाजता, राहत सोशल ग्रुप जालनातर्फे आयेशा लान्स उर्दू हायस्कूल पाठी मागे, कदिम जालना येथे मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन केले जात आहे. यावर्षीच्या मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांच्या प्रचारासाठीचे वॉल पोस्टर आज सायंकाळी ७ वाजता मगरीबच्या नमाजानंतर, जालनाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते अंबड रोड, जालना येथील संपर्क कार्यालयात विमोचन करण्यात आले. याप्रसंगी जालनाचे खासदार डॉ. कल्याण काळे, राहत सोशल ग्रुप जालनाचे अध्यक्ष शेख अफसर शेख जी,



लियाकत अली खान यासिर जालनावी, संस्थापक सचिव, शेख सलीम शेख मुहम्मद, काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष बदर चाऊस, काँग्रेस जिल्हाध्यक्ष कल्याण दले, शहर अध्यक्ष डॉ. विशाल धनोरे, अब्दुल रऊफ परसु वाले, कलीम खान आणि इतर उपस्थित होते. या प्रसंगी, खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आवाहन केले आहे की, ज्यांना आपल्या मुलामुलींचे लग्न राहत सोशल ग्रुप जालना अंतर्गत मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यात करायचे आहे, त्यांनी १५ नोव्हेंबरपूर्वी राहत सोशल ग्रुप जालनाचे पदाधिकारी शेख अफसर शेख जी, लियाकत अली खान यासिर जालनावी, शेख सलीम शेख मुहम्मद आणि इतर पदाधिकारयांशी संपर्क साधावा. हे लक्षात घ्यावे की, राहत सोशल (पान २ वर)

# जुगार अड्ड्यावर सदर बाजार पोलिसांची धाड; १० जणांवर कारवाई



जालना : शहरातील नळगल्ली परिसरात सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर सदर बाजार पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत जुगार खेळणाऱ्या १0 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ४७ हजार ७00 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे १.३0 वाजण्याच्या सुमारास नळगल्ली परिसरातील अजय यांच्या म्हशीच्या गोठ्याच्या बाजूला सार्वजनिक ठिकाणी काही जण जुगार खेळत असल्याची माहिती सदर बाजार पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला.

या कारवाईदरम्यान विजय कैलास राजपूत, पवन संदीप जाधव, कपिल दिलीप भुमरे, रोहित सुनील श्रीश्रीम, विशाल किशनसिंग राजपूत, अतिश प्रकाश पाटोळे, समर्थ नंदकिशोर अलंकार, बालाजी बळीराम राजपूत, राजेश गणेश धारेगावकर आणि साहील राजू सरोदे यांच्यावर कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी घटनास्थळावरून जुगाराचे पत्ते, रोख रक्कम तसेच विविध कंपन्यांचे मोबाईल फोन असा १,४७,७00 किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७६३/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सदर बाजार पोलीस करीत आहेत.

सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या अवैध जुगाराच्या अड्ड्यावर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे जुगार खेळणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# पत्रकारांनी बातमीदारी करताना आरोग्याची काळजी घ्यावी सर्वपक्षीय नेत्यांचे आवाहन; युवा पत्रकार आशीष रसाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली

जालना । प्रतिनिधी : पत्रकारिता हे केवळ व्यवसायाचे क्षेत्र नसून समाजातील घडामोडी, प्रश्न, समस्या आणि जनतेचा आवाज शासन-प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण समाजसेवेचे कार्य आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांकडे पाहिले जाते. समाजातील बऱ्या-वाईट घटनांचे वृत्तांकन करण्यासाठी पत्रकार दिवस-रात्र धावपळ करीत असतात. मात्र, ही धावपळ करताना पत्रकारांनी स्वतःच्या आरोग्याकडेही तितकेच गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. नियमित



व्यायाम, सात्त्विक आहार, पुरेशी झोप आणि तणावमुक्त जीवनशैलीचा अवलंब करून पत्रकारांनी आपले आरोग्य जपावे, असे आवाहन सर्वपक्षीय ज्येष्ठ नेत्यांनी केले. युवा पत्रकार, प्रसिद्ध वक्ते आणि उत्कृष्ट सूत्रसंचालक आशीष रसाळ यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित श्रद्धांजलीपर कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांच्या आरोग्याचा मुद्दा गांभीर्याने मांडला. चाळीशीतील आशीष रसाळ यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने पत्रकारिता, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या निधनाने जालन्यातील पत्रकारिता क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. आशीष रसाळ यांनी गेल्या सुमारे वीस वर्षांच्या काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत पत्रकारिता क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. युवा पत्रकार म्हणून काम करत असतानाच प्रभावी वक्तृत्व आणि उत्कृष्ट सूत्रसंचालनाच्या माध्यमातून त्यांनी विविध (पान २ वर)

# धोपटेश्वरचे माजी सरपंच श्रीरंग दाभाडे यांच्या निवासस्थानी आ. नारायण कुचे यांची सदिच्छा भेट



**नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी** : धोपटेश्वर येथील माजी सरपंच श्री. श्रीरंग बापू दाभाडे यांच्या निवासस्थानी बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी आ. कुचे यांनी श्रीरंग बापू दाभाडे तसेच त्यांच्या परिवाराशी विविध विषयांवर मनमोकळ्या गप्पा मारत आपुलकीने संवाद साधला. या भेटीदरम्यान परिसरातील विविध सामाजिक व स्थानिक विषयांवर चर्चा झाली. जुन्या आठवणींना उजाळा देत स्नेहपूर्ण वातावरणात विचारांची देवाणघेवाण झाली. या सदिच्छा भेटीमुळे दाभाडे परिवारासोबतच्या स्नेहसंबंधांना आणखी उजाळा मिळाला.

## आशामती ढगे यांचे निधन



परतूर : शहरातील गाव भागातील सुतार गल्ली येथील रहिवाशी आशामती लक्ष्मण ढगे (६०) यांचे शनिवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, सुना,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शनिवारी सायंकाळी अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. परतूर येथील हॉटेल व्यावसायिक माऊली ढगे यांच्या त्या आई होत.



सार्वजनिक गणेश उत्सव २०२६ : अंबड येथे जुन्या गॅस एजन्सी जवळील स्वराज्य गणेश मंडळ येथे आरती साठी उपस्थित नगरपरिषद अंबड येथील नगराध्यक्ष तथा प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक आदरणीय श्री.केदार दादा कुलकर्णी तसेच मंडळाचे अध्यक्ष संपूर्ण जैन, उपाध्यक्ष वंश मणियार , सचिव अक्षय वैद्य , प्रथमेश कौशिके तसेच मंडळाचे सर्व सदस्य व कॉलनी येथील सर्व महिला भगिनी व जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# मुलींना कमर्शियल पायलट होण्याची संधी

जालना : जालना जिल्ह्यातील होतकरू मुलींना विमान वाहतूक क्षेत्रात करिअर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून "IndiGoReach'À`m "Giving Wings to Fly - Shaping the Future of Indian Women in -viation' या उपक्रमांतर्गत विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील उ्झउ क्रश्रश्र येथे होणार आहे. या कार्यक्रमातून पात्र युवतींना कमर्शियल पायलट म्हणून करिअर करण्याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षणाच्या संधीची माहिती दिली जाणार आहे. या योजनेसाठी १८ ते ३८ वयोगटातील भारतीय महिला उमेदवार पात्र आहेत. बारावीमध्ये इंग्रजी, भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांत प्रत्येकी किमान ५१ टक्के गुण असणे आवश्यक आहे. तसेच लागू असलेले एथड उत्पन्न निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या पात्र (पान २ वर)

# पावसाअभावी शेतकऱ्याने सोयाबीन पिकात सोडल्या मेंढ्या

भोकरदन/प्रतिनिधी : भोकरदन तालुक्यातील मौजे हसनाबाद शहरातील गट नंबर ३२४ मधील शेतकरी नामे श्रीमती ताराबाई रामविलास राठी यांनी त्यांच्या एकूण क्षेत्र दोन हेक्टर शेतातील एकूण ५ एकर क्षेत्रामध्ये सोयाबीन पिकाची लागवड केलेली होती.त्यापैकी साडेतीन एकर क्षेत्रातील सोयाबीन पीक सध्या काही अंशी व्यवस्थित असून,दीड एकर क्षेत्रातील सोयाबीन पिकाचे पावसाअभावी व कोरड्या व कडक उन्हाच्या दमट वातावरणाच्या परिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे. त्यांना या शेतात सोयाबीनचे साधारणतः ५ ते ७ क्विंटल प्रति एकर उत्पादन अपेक्षित असते.सध्याचा सोयाबीनचा बाजारभाव सरासरी अंदाजे ५,000 प्रति क्विंटल आहे. त्यामुळे १.५ एकर क्षेत्रातील झालेल्या नुकसानीमुळे त्यांचे आजच्या स्थितीत पन्नास हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.दिवसेंदिवस वातावरणाच्या लहरीपणामुळे पावसाअभावी शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहे. पाऊस पडत नसल्याने कडक उन्हाच्या व उष्ण वातावरणाचा फटका शेतातील पिकांना बसत आहे.सोयाबीन पिकासह,कापूस,मका,तूर इत्यादी पिके शेतकऱ्यांच्या हातातून जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे.यामुळे हसनाबाद,तळेगाव,राजूर,के दारखेडा सर्कल मधील सर्व शेतकरी आर्थिक विवचनेत आहे.शासनाने शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत करावी अशी शेतकऱ्यांची शासनाकडे मागणी वाढलेली आहे.

# संपादित केलेली अधिकृत जमीन शेतकरी समाजाला परत करा : जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

जालना/प्रतिनिधी : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वतीने उपमुख्यमंत्री मा एकनाथराव शिंदे जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे ईमेल द्वारे निवेदन देऊन मागणी करण्यात आली निवेदनात पुढे मांडले आहे की, मंठा तालुक्यातील आकणी गावाच्या शिवारातील सुमारे १२00 एकर जमीन तलाव प्रकल्पासाठी संपादित करून संबंधित शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आल्याचे सांगण्यात येत असतानाही, गेल्या २५ ते ३0 वर्षांपासून तलावाचे काम अपूर्ण असल्याचा मुद्दा मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून तलावाचे रखडलेले काम पूर्ण करावे आणि परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी मा. उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजीराव शिंदे व मा. जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे ई-मेलद्वारे निवेदन देऊन केली आहे. निवेदनानुसार, तलाव प्रकल्पासाठी जमीन संपादित करून शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आला असल्यास प्रकल्पाचे काम निर्धारित कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र तब्बल २५ ते ३0 वर्षे उलटूनही काम अपूर्ण राहण्यामागील नेमके कारण काय, या विलंबाला जबाबदार कोण, तलावाला मंजुरी कोणत्या वर्षी मिळाली, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता कधी देण्यात आली, किती निधी मंजूर झाला व प्रत्यक्ष किती निधी खर्च झाला, निविदा कोणत्या कार्यालयामार्फत काढण्यात आली, कार्यारंभ आदेश कोणाला देण्यात आला, संबंधित (पान ३ वर) कंत्राटदार किंवा एजन्सी कोणती आणि आजपर्यंत कामाची भौतिक व आर्थिक प्रगती किती आहे, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. कोरडवाहू शेती आणि बागायती शेतीच्या उत्पादनात व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठा फरक असतो. त्यामुळे तलावाचे काम दीर्घकाळ अपूर्ण राहिल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असण्याची शक्यता असून, या नुकसानीची वस्तुस्थिती तपासण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यंदा ७ जून २०२६ पासून पावसाची अनिश्चितता आणि शेतीसमोरील संकट कायम असल्याचा संदर्भ देत, तलाव पूर्ण अवस्थेत असता तर परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनाचा मोठा फायदा झाला असता, असेही सोळंके यांनी म्हटले आहे. तसेच संपादित केलेल्या जमिनीची सध्याची प्रत्यक्ष स्थिती काय आहे, त्या जमिनीवर कोणाचा ताबा आहे, सध्या पेरणी केली जाते का, केली असल्यास कोणाकडून केली जाते आणि संपादनानंतर जमीन कोणत्या कारणासाठी वापरली जात आहे, याची महसूल विभाग व संबंधित प्रकल्प (पान २ वर)